महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. पीआर-३ / पॉवरलुम /४०५७५** **दिनांक :१२.११.२००७**

# वाणिज्य परिपत्रक क्र. ६९

*(या कार्यालयाचे पत्र क्र.पीआर-३/पॉवरलुम/४०४८४ दि. ८.११.०७)*

**विषय :** यंत्रमाग ग्राहकाला १ एप्रिल २००७ पासुन लागू होणारे सवलतीचे दर.

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र.२७/ऊर्जा-३ दिनांक १७.१०.२००७
२) या कार्यालयाचे पत्र क्र. पीआर-३/पॉवरलूम/१८६५७ दिनांक २३.०४.२००७.
३) शासन निर्णय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र.२७/ऊर्जा-३ दिनांक २९.१०.२००७

---

वरील संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये उच्चदाब व लघुदाब यंत्रमाग धारकांना रु. १.६० प्रति युनिट हा शासनाचा सवलतीचा दर लावण्याचे निर्देशित करण्यात आलेले होते. सन २००७-०८ करीताचा सवलतीच्या दराबद्दल शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत सदर सवलतीचा दर तात्पुरत्या स्वरुपाचा असल्याबद्दल सदर पत्रामध्ये उल्लेखित करण्यात आलेले होते.

महाराष्ट्र शासनाने त्याचे संदर्भिय निर्णय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र.२७/ऊर्जा-३ दि. १७.१०.२००७ नुसार दि. १ एप्रिल २००७ पासुन पुढील कालावधीकरिता यंत्रमाग ग्राहकांसाठी सवलतीचे दर जाहिर केलेले आहेत.

१) राज्यातील यंत्रमाग ग्राहकांना १ एप्रिल २००७ पासुन पुढील कालावधीकरिता प्रचलित वीज दराऐवजी खालील प्रमाणे सवलत देण्यात यावी.

अ) स्थिर आकारात पुर्वीप्रमाणे १००% सवलत कायम ठेवण्यात यावी.

ब) वीज आकार, इंधन समायोजन आकार अणि अतिरिक्त वीज आकारात (Additional Supply Charges) ४० % सवलत देण्यात यावी.

२) यंत्रमाग ग्राहकांना अनुदान वजा जाता त्यांनी भरावयाच्या उर्वरित वीज बिलाच्या रक्कमेवर नियमाप्रमाणे विद्युत शुल्काची आकारणी करण्यात यावी तसेच, वीज विक्रिवरील कर विहित दराने यंत्रमाग ग्राहकांनी भरावा

वरील निर्णयानुसार  वीज वितरण कंपनीवर  पडणा-या आर्थिक बोज्याची भरपाई बाबतची  अंमलबजावणी शासन मा. वीज नियामक आयोगाच्या आदेशाच्या अधीन राहुन करेल.

वरीलप्रमाणे दयावयाची सवलत १ एप्रिल २००७ पासुन पुढील कालावधीकरीता असल्यामुळे १ एप्रिल २००७ पासुन ते आजतागायत वितरीत केलेल्या देयकाचे पुर्नमापन करुन ग्राहकांकडून येणे असलेली तफावतीची रक्कम  चार (४) समान हप्त्यांमध्ये त्यांच्या माहे डिसेंबर २००७, जानेवारी २००८, फेब्रुवारी २००८ व मार्च २००८ च्या देयकातून वसुल करण्यात यावी व डिसेंबर २००७ पासुन ग्राहकांना शासनाच्या वरीलप्रमाणे निर्णय झालेल्या सवलतीच्या दराप्रमाणे वीज देयके वितरीत करावी.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**<u>प्रत माहितीस सादर :-</u>**

**मुख्य महाव्यवस्थापक (माहिती  तंत्रज्ञान)**

शासनाने जाहिर केल्याप्रमाणे प्रचलित दराऐवजी वरीलप्रमाणे सवलतीच्या दराचे देयक माहे डिसेंबर २००७ पासुन यंत्रमाग ग्राहकांना वितरीत करण्यात यावीत व तफावतीची रक्कम चार समान हप्त्यांमध्ये वरीलप्रमाणे वसुल करण्यात यावी, तसेच शासकीय पत्र क्र. टेरिफ २००७/प्र.क्र.२७/ऊर्जा-३ दि. २९.१०.२००७ नुसार शासनातर्फे देण्यात येणा-या सवलतीची रक्कम यंत्रमागग्राहकांच्या विज बिलात, महाराष्ट्र विद्युत विज नियामक आयोगाने ठरवून दिलेल दर, राज्य शासनाची सवलत, सवलतीचे दर आणि त्यांचा कालावधी व निव्वळ देय रक्कम स्पष्टपणे नमूद करावी व त्या अनुषंगाने यंत्रमाग ग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये बदल करण्यात यावा.

**<u>प्रत रवाना :-</u>**

१. मुख्य अभियंता, सं व सु, परिमंडळे, म.रा.वि.वि.कं.मर्यादित.
२. अधिक्षक अभियंता, सं व सु, मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
३. कार्यकारी अभियंता, सं व सु, विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
४. उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, सं व सु, उपविभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.

**C:\Ex Er III\Circular Subsidy\Circular Subsidy.doc**